दै. देशोन्नती दि. 4 feb-2025

# कार्यालय नगर परिषद वरोरा

ता. वरोरा जि. चंद्रपूर (महाराष्ट्र)442907

स्थापना – 17 मे 1867

Office Phone : ०७१७६-२८२००९, २८२७१७

Email ID : mcwarora@gmail.com

जा.क्र.: क्र./प्रशासन/२०२५/९१ दिनांक ३/२/२०२५

## जाहीर सूचना

### "महाराष्ट्र लोकसेवा हक्क अध्यादेश २०१५"

### "अधिनियम अंतर्गत विविध लोकसेवा अधिसूचित सेवा देणेबाबत"

सर्व नागरिकांना, सामाजिक संस्था, शैक्षणिक संस्था, वाणिज्य संस्था तसेच सर्व राजकीय पक्ष, शासकीय व निमशासकीय कार्यालय तसेच केंद्रीय कार्यालय यांना याद्वारे सूचित करण्यात येते की, लोकसेवा हमी कायद्यांतर्गत नगर विकास विभागाने विविध शासन निर्णयाद्वारे एकून ६७ सेवाची यादी प्रसिद्ध केलेली आहे. तसेच वेळोवेळी नवीन लोकसेवा यादी प्रसिद्ध करून नगरप्रशासन विभागाला दिली जाते. त्यानुसार सर्व पात्र व्यक्तींना पारदर्शक, कार्यक्षम व समयोचित सेवा देण्याकरिता महाराष्ट्र लोकसेवा हक्क अध्यादेश २०१५ कलम ३ नुसार विहित नमुन्यात अर्ज आवश्यक कागदपत्रासह सादर केल्यास नगर परिषद वरोरा कडून आवश्यक लोकसेवा विहित मुदतीत दिली जाते. या करिता नगर परिषद वरोरा तर्फे जनमाहिती अधिकारी, प्रथम अपिलीय अधिकारी व द्वितीय अपिलीय अधिकारी यांना पदनिर्देशित करण्यात आलेले आहे. तरी नगरविकास विभागाने विविध शासन निर्णयाद्वारे विहित केलेल्या सेवांची यादी वरोरा नगर परिषदेच्या नोटीस बोर्ड वर प्रसिद्ध करण्यात आलेली आहे.

स्वा/-

मुख्याधिकारी

नगर परिषद, वरोरा

फडणवीस यांनी जिल्हानिहाय आढावा घेतला. उपमुख्यमंत्री अजित पवार, पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री गुलाबराव पाटील, आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर, ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे, राज्यमंत्री पंकज भोयेर. योगेश कदम, मेघना बोर्डीकर, मुख्य सचिव श्रीमती सुजाता सौनिक यांच्यासह संबंधित विभागाचे सचिव उपस्थित होते. तर या बैठकीस बुलढाणा येथून जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील, मुख्य कार्यकारी अधिकारी गुलाबराव खरात, कार्यकारी अधिकारी राहुल जाधव, नगरविकास जिल्हा सह आयुक्त पेंटे, जिल्हा समन्वयक डॉ. विवेक सावके, तसेच नगरपरिषदांचे मुख्याधिकारी उपस्थित होते.

शहरी व ग्रामीण भागातील प्रधानमंत्री आवास योजनांच्या सद्यस्थिती व अंमलबजावणीची माहिती घेऊन श्री. फडणवीस म्हणाले की, भूमीहीन करून कामांना वेग द्यावे. गायरान जमिनींवरही आवास योजना राबविण्यासाठी कार्यवाही करावी. आवास योजनांच्या घरकुलांसाठी वाळू, वीटा व सिमेंट आदी एकाच ठिकाणी मिळावे, यासाठी घरकुल मार्ट संकल्पना राबविण्यात यावी. यासाठी बचत गटांचे सहाय्य घ्यावे. तसेच आवास योजनांसाठी वाळू देण्यासंदर्भातील परिपत्रक पुन्हा निर्गमित करण्यात यावे. तसेच महसूल विभागाने गावठाणासंदर्भात योग्य ती कार्यवाही करावी. शहरी भागातील आवास योजनांना गती देण्यासाठी नगर विकास विभागाने स्थानिक स्वराज्य संस्थांना निर्देश द्यावे. तसेच आवास योजनांच्या प्रगतीची माहिती नियमित अद्ययावत करावी. प्रधानमंत्री आवास योजना टप्पा दोनची मंजुरी, कामे आदी कार्यवाहीही स्थानिक स्वराज्य संस्थांनी वेगाने करावे, असेही मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी सांगितले.

आयुष्मान कार्डच्या वितरणाला गती द्यावी

आयुष्मान भारत-प्रधानमंत्री जन आरोग्य योजना व राज्य शासनाची महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजनांचा लाभ राज्यातील महत्त्वाकांक्षी योजना आहे. ग्रामीण भागातील नागरिकांना पिण्याचे पाणी मुबलक उपलब्ध व्हावे यासाठी जलजीवन मिशन योजनेतील कामे गतीने, कालमर्यादेत व गुणवत्ता पूर्ण करावीत. या योजनांचे सोलारायजेशन झाल्यास वीजेबरोबरच वीज बिलात बचत होईल, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले.

जिल्ह्यात सुरु असलेल्या केंद्र व राज्य सरकारच्या फ्लॅगशीप योजना गतीने सुरु आहेत. यामध्ये प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत घरकूल, प्रधानमंत्री जनआरोग्य योजना, आयुष्मान कार्ड वितरण, जलजीवन मिशनअंतर्गत 'हर घर जल' ची कामे प्रगतीपथावर आहेत. घरकूलांच्या बाबतीत उद्दिष्ट गतीने पूर्ण करण्याचे नियोजन केले आहे. घरकुलांसाठी जागा उपलब्ध करून देण्याचे निर्देश यंत्रणांना देण्यात आले आहे. लाभार्थ्यांना ४ थ्या हप्त्याची रक्कम वितरित करण्याचे निर्देशही देण्यात आल्याचे जिल्हाधिकारी डॅा. किरण पाटील यांनी सांगितले. मुख्य कार्यकारी अधिकारी गुलाबराव खरात यांनी घरकुलाचे प्रश्न मार्गी लावून कामे पूर्ण करण्यात येतील, असे बैठकीत सांगितले.

Scanned with OKEN Scanner